
मुकुलगंध
सचिन कृष्णा निकम
ऋतु बहरला नवानवा, वाटे मज हवाहवा
मखमली स्पर्शाचा शहारा, फुलवी मनी गारवा
उमटले हवेत अल्हाद मधुर प्रीतीचे तरंग
प्रकटले भवताली अलगद आस्मानाचे सुखदरंग
चाहूल हळुवार तुझ्या येण्याची, जूळु लागले रेशमीबंध
पाहुनि समोरी तुला, लाभले सकल ''मुकुलगंध''
ज्ञान प्रकाशन
मूल्य रु.५० मात्र
सचिन कृष्णा निकम
मुकुलगंध

# मुकुलगंध

© सर्व हक्क सुरक्षित

**कवीः सचिन कृष्णा निकम**

**9890016825**

sachinikam@gmail.com

पत्ता : बी **706**. मॉन्ट वर्ट ग्रॅन्ड पाषाण सुस रोड

पुणे **411021** .

# मनोगत

जेव्हा शब्दांची बीजे रूजतात आणि कोवळे कोवळे अंकुर फुटू लागतात तेव्हा नवीन आयुष्य जन्माला येत आणि उंचच उंच झेपावत जणू काय सूर्यालाच स्पर्श करायला निघालय . कळया उमलतात आणि गंध आसमंतात दरवळतो . खरच कल्पनांना कसलच क्षितिज नसत, कसलीच बंधने नसतात, नसते कोणतीच सीमा .

"मुक्तस्पंदन" आणि "मुग्धमन" च्या प्रचंड लोकप्रियतेनंतर पुढे काय . . . वाचक रसिकांची विचारपूस सुरू झाली . "कधी मिळणार नव काव्य वाचयला" . माझ्या

चेह-यावर अजूनच आनंद आणि उत्साह झळकू लागला . पण अजून थोडा अवकाश हवा होता काहीतरी नव, वेगळ आणि अभिजात लिहायच असा मनाने अट्टाहासच धरला होता .

ऋतु बहरला नवानवा, वाटे मज हवाहवा

मखमली स्पर्शाचा शहारा, फुलवी मनी गारवा

उमटले हवेत अल्हाद मधुर प्रीतीचे तरंग

प्रकटले भवताली अलगद आस्मानाचे सुखदरंग

चाहूल हळुवार तुझ्या येण्याची, जूळु लागले रेशमीबंध

पाहुनि समोरी तुला, लाभले सकल "मुकुलगंध"

## अर्पणपत्रिका

आदरणीय आजी आजोबा आणि आई बापू

ज्यांनी माझ्यावर सुसंस्कार केले आणि भरभरून प्रेम केले .

प्रिय पत्नी सौ . ममता हिने वेळोवेळी प्रोत्साहन दिले

आणि माझ्या कवितांवरही तितकेच प्रेम केले .

## अनुक्रमणिका


1 . मंगलमुर्ती मोरया

2 . सत्यमेव जयते

3 . मुग्धमन

4 . सहजासहजी

5 . चाहूल

6 . नकोस मिटू पापण्या

7 . लागले वेध

8 . क्षण मंतरलेले

9 . खेळ लपाछपीचा

10. प्रेमात पडण म्हणजे काय?

11 . दोनच घडींचा डाव

12 . अति अति

13 . स्मृती विस्मृती

14 . शब्द

15 . मिजास

16 . कदमताल

17 . स्वरूपदर्शन

18 . भीमगर्जना

19 . बाभळीची फुले

20 . वाताहात

21 . प्रिय आजी आजोबा

22 . आला आला श्रावणमास

23 . अंगा-या भिंगा-या

24 . जिनेदो बचपन सुहाना

25 . वसुधैव कुटुंबकम्

26. ...क्या बात!

27 . तुमही तुम

28 . मैं शायर तो नही

29. Just Dance

30. Quote to Note

# मंगलमुर्ती मोरया

**02 . 06 . 2011**

श्रीगणेशाय नमः ॐ गं गणपतये नमः ।

शुभारंभ नामोच्चारे शुभलाभ स्वस्ति सदा ॥

सिद्धिविनायक वरदविनायक मोरया

चिंतामणी महागणपती मोरया

मयुरेश्वर बल्लाळेश्वर मोरया

गिरिजात्मज विघ्नहर मोरया

गौरीसुत एकदंत मोरया

स्कंदपूर्वज रूद्रप्रिय मोरया

भालचंद्र एकाक्षर मोरया

लंबोदर गदाधर मोरया

शूर्पकर्ण धूम्रवर्ण मोरया

गजानन मूषकवाहन मोरया

गणाध्यक्ष कृष्णपिंगाक्ष मोरया

वक्रतुंड हेरंब मोरया

मृत्युंजय निर्भय मोरया
मनीष अवनीष मोरया
क्षमाकरम् सुरेशवरम् मोरया
देवादिदेव शंभव मोरया

रिद्धिसिद्धि प्रदायक मोरया
कृपाळु इच्छापुर्ती मोरया
बुद्धिवृद्धि प्रदायक मोरया
सुमुख मंगलमुर्ती मोरया

बिल्वदल जास्वंदीफूल अर्पण तुझिया स्मरणी
हरितदूर्वा प्रसादमोदक अर्पण तुझिया चरणी
करी कृपा गणनायका आनंद सदा दे या भुवनी
वरी नृपा विनायका सुखसंपदा नांदुदे या अवनी

## सत्यमेव जयते (प्रेरणागीत) 05 . 06 . 2011

जे जे निष्पाप निर्मळ वाहते

ते ते अखंड (सदैव) विजयी राहते

सन्मतीने सन्मार्ग सकलजन भद्राय

जैसे कर्म तैसाच मिळे न्याय

कोरसः सत्य सत्य, सत्यमेव जयते, जयते जयते जयते . . 1 . .

धर्मांध माजविती धुमाकुळ, दहशत जनमनी व्याकुळ

क्रूर विसरले माणुसकी, आवळणार कोण ह्यांची मुस्की

ठेचने दुष्टप्रवृत्तींना ऐशा न अन्य पर्याय

जैसे कर्म तैसाच मिळे न्याय

कोरसः सत्य सत्य, सत्यमेव जयते, जयते जयते जयते . . 2 . .

घोटाळयांचा राजा की राजाचे घोटाळे

सामान्य रयतेच्या गळी महागाईचे वेटोळे

रंजले गांजले निजती भुकेले

हडपती शिधा त्यांची सत्तेचे भुकेले

कोण रोखेल पुढा-यांना भ्रष्टाचार मातलाय

जैसे कर्म तैसाच मिळे न्याय

कोरसः सत्य सत्य, सत्यमेव जयते, जयते जयते जयते . . **3** . .

समाजकंटक करिती शोषण, करेल कोण ह्यांना शासन

ऊत गुन्हेगारीला आलाय, तोच आता नेता झालाय

अन्यायाविरूद्ध लढा मांडला, जीव मुठीतून मातीत सांडला

आहे का कोणी सतर्क, सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जैसे कर्म तैसाच मिळे न्याय

कोरसः सत्य सत्य, सत्यमेव जयते, जयते जयते जयते . . **4** . .

लढले क्षेत्रकुरू पांडव स्वजनांसाठी

दौडले चौफेर वारू शिवबाचे स्वराज्यासाठी

संघर्षले जीवन बाबांनी समतेसाठी

अर्पिले आयुष्य महात्म्यांनी स्वातंत्र्यासाठी

उज्ज्वल भारतभविष्यासाठी रचूया नवा अध्याय

जैसे कर्म तैसाच मिळे न्याय

कोरसः सत्य सत्य, सत्यमेव जयते, जयते जयते जयते . . **5** . .

## मुग्धमन

**15 . 06 . 2011**

रिमझिम रिमझिम सरी सरसरल्या

चिंब चिंब अंग भिजवून गेल्या

मिटुनि डोळे चेह-यावर झेलल्या

पसरूनि हात गिरक्या घेतल्या

न राहिले भान कसलेच मजला

वेचले ओंजळीत सारे आनंदक्षण

मलाही न कळले कसे जाहले असे ‘मुग्धमन’

खळखळ खळखळ लाटा खळखळल्या

मृदु वाळूंसवे किनारी मिसळल्या

तळहाताने हवेत उडवल्या

न राहिले भान कसलेच मजला

वेचले ओंजळीत सारे शिंपलेशंख

मलाही न कळले कसे जाहले असे ‘मुग्धमन’

टिमटिम टिमटिम चांदण्या टिमटिमल्या

स्वैर चंद्रासवे नभात रमल्या

घेतला हाती हात तुझ्यासवे चालताना

उलगडले गुपीत प्रीतीचे तुझ्यासवे बोलताना

टिपले डोळयांत सारे भावबंध

मलाही न कळले कसे जाहले असे ‘मुग्धमन’

## चाहूल

**16 . 06 . 2011**

हल्ली, नाही ठाऊक हरवलय कुठे भान

एरव्ही मंदधुंद, वा-याला सुटले कसले उधान

आजकाल, नाही ठाऊक गुंतलय कुठे मन

एरव्ही निरव संथ, पाण्यावर उठले कसले तरंग

निळया आकाशाची निळाई कुणी मिसळली सागरात

आठवणींने कुणाच्या प्रणयगीते घुसळली काळजात

सरली रात पहात पहात चंद्र पूनवेचा नभात

स्मरली स्वप्नात पहाट गुलाबी जागली सोनसळी प्रभात

संकेत समजावे कशाचे हे, हवे टाकायला जपून पाऊल

वेध कुणाच्या मिलनाचे हे, सये लागली प्रेमाची चाहूल .

## सहजासहजी

**28 एप्रिल 2011**

ध्यानीमनी नसताना होई तुझाच आभास

चंद्र गगणी असताना होई चांदण्यांची आरास

पाहिले तुला पहिल्यांदा जेव्हा राहिलो पाहतच स्तब्ध

नव्हते ठाऊक नावही तुझे कसे विचारू होतो निःशब्द

जुळला पुन्हा योग सुमंगल

वास्तव जादू की नवल

तळहातावर बसलो गिरवीत नुकतेच नाव तुझे कळलेले

अंकुरले बीज प्रीतीचे नकळत मनी जे रूजलेले

भेटलीस अशी अवचीत राणी

विस्फारले नयन अडखळली वाणी

काय सुचेना काय करावे

क्षण आनंदी ओंजळीत धरावे

किंचीत स्मित किंचीत लाजली ती फुलराणी माझी

केली प्रतिक्षा जिचीच आजवर भेटली ती मज सहजासहजी

## नकोस मिटू पापण्या

**26 जून 2011**

नकोस मिटू पापण्या, पिऊ देना मधुरामृत
नकोस मिटू पाकळया, न्हाऊ देना परिमळात तृप्त

भाषा ही डोळ्यांची डोळ्यांना समजली
ओठांनी बोलण्याआधी ह्दयाला उमजली

भिरभिरती नजर आता इथे स्थिरावली
एकरूप सवे जाहली नि सारी दुनिया दुरावली

श्वास थोडा मंदावला नि पुन्हा धावला
स्पंदने जरा थबकली नि नव्याने आवेगली
कसे विलक्षण झाले, क्षणात किमया घडली
आधी ना कधी अशी बेधुंद प्रीत जडली

नकोस मिटू पापण्या, पिऊ देना प्रीतगंध
नकोस मिटू पाकळया, भिनूदे रोमरोमांत परमानंद

## लागले वेध

**25 मे 2011**

लागले वेध आता तुला पुन्हा भेटण्याचे
उमगले सर्वार्थ नव्याने जीवन जगण्याचे

नव्हतीस जोवर तू माझ्या आयुष्यात
दाटली होती उदासीनता माझ्या काळजात

तू आलीस, आलीस तू घेऊनि चैतन्य संजीवनी
विस्मरलो हरवलो पाहता तुझ्या लोचनी

न कळले, न वळले दिसले न अन्य काही
खिळली नजर तुझ्यावर सुखनयने धन्य पाही

स्फुरल्या मला तेव्हा रेशमी काव्यपंक्ती
स्मरल्या पहाटे जेव्हा तुझ्याच स्वप्नसंगती

लागले वेध आता तुला पुन्हा भेटण्याचे
उमगले सर्वार्थ नव्याने जीवन जगण्याचे

## क्षण मंतरलेले

**5 जुलै 2011**

बोलू कसे, कसे बोलू शब्द शब्दांत अडखळले
चालू कसे, कसे चालू पाऊल पावलांत घुटमळले
मागितले तुला, तुलाच मागितले नभांगणी तारे निखळले
कळले मला, मला कळले पाहताक्षण सारे मंतरलेले .

न ठाऊक तुला काही न ठाऊक मलाही काही
येण्याची तुझ्या मन आतुर वाट पाही
तू होतीस अशी तेव्हाही, तू आहेस तशी आताही
ओढ नव्याने भेटण्याची का पाऊले करती घाई .

वाचना जरा, जरा वाचना सये गुपीत लोचनी लपलेले
सांगना खरे, खरे सांगना अंतरी आजवर जपलेले
मिळाले सर्व, सर्व मिळाले जे जे स्वप्नी रंगवलेले
कळले मला, मला कळले पाहताक्षण सारे मंतरलेले .

## खेळ लपाछपीचा

**23 जुलै 2011**

लागल्या खेळू नजरा खेळ लपाछपीचा

लागला जुळु हळुवार मेळ स्पंदनांचा

किंचित स्मित गाली, मिचकावुनि डोळयांची भाषा

माझ्याही चेह-यावर उमटल्या प्रतिबिंबाच्या रेषा

निखळ निर्मळ निरागस प्रीत

मिळाली सबब गाण्यास जीवनसंगीत

हळुवार ढळली बट चेह-यावरती

नको फुंकुस तो-यात, उडवूस वा-यावरती

तू आलीस नि गेलीस मी अजुनि इथेच उभा

पाठलाग सावलीचा धूसर, झाली मंद दिनप्रभा

फक्त एकदाच वळुनि मागे पाहशील ना

गुपीत मनातले कळवळुनि सांगशील ना

लागल्या खेळू नजरा खेळ लपाछपीचा

लागला जुळु हळुवार मेळ स्पंदनांचा

घुटमळतोय इथेच फक्त तुला पाहावया

आडोश्यामागून  पाहतोय चेहरा, पुन्हा तुला भेटावया .

## प्रेमात पडण म्हणजे काय ?

**25 जुलै 2011**

प्रेमात पडण म्हणजे काय ?

दोन जीवांना लागलेली ओढ की पुन्हापुन्हा भेटण्याचे वेड

दोन देहांचे मधुरमिलन की एकरूप झालेली स्पंदन

प्रेम म्हणजे देणगी दैवी

प्रेम म्हणजे राग भैरवी

प्रेम म्हणजे भेट अमूल्य

प्रेम म्हणजे अनुभुती अतुल्य

नुकतच प्रेमात पडलेल युगुल कस गुलुगुलु बोलत

पूर्वी कधीऽ प्रेमात पडलेल दाम्पत्यही गुलुगुलु बोलत

प्रेमात पडलेल पाहून लोक हसतीलही

जणू काय प्रेमात नव्हे खड्डयात पडल्यासारख

प्रेमात पडलेल पाहून लोक फसतीलही

जणू काय प्रेमात नव्हे अड्डयात हरल्यासारख

हाच बॉयफ्रेंड मिळावा म्हणून काहीजनी बाप्पाला नवस बोलतात

हीच गर्लफ्रेंड मिळावी म्हणून दीडशहाणे शिकवणी घेत बसतात

प्रेम काही बाजारात नाही मिळत विकत

आणि जरी मिळाल तरी जास्तही नाही टिकत

त्यात काय विशेष प्रेम तर पशुपक्ष्यांनाही होत

हेच तर विशेष आहे प्रेम चराचरांत स्थित आहे

प्रेमात पडण म्हणजे काय ?

दोन जीवांचा जिव्हाळा की एकमेकांना लागलेला लळा

दोन मनांचा संगम की स्वप्नसृष्टी विहंगम .

## दोनच घडींचा डाव

**26 मे 2011**

मरण अटळ आहे म्हणून काय जगणेच सोडायचे
मृत्युला पुढे ढकलण्यासाठी आयुष्यभर असते लढायचे
खर तर मृत्यु म्हणजे अंतिम परीक्षा
जिचा अभ्यास करायचा दिनरात न ठेवता कसली अपेक्षा
स्वर्ग मिळेल की नरक की पुर्नजन्म मृत्युलोकांत
मोक्ष मिळेल की भटकंती की पुर्नजन्म मायापाशांत
मी म्हणतो एवढा विचार करायचाच कशाला
दोनच घडींचा डाव आहे मोडायचा कशाला . .1 . .

मृत्युची नुसती कल्पना जरी मनात आली तरी
श्वास स्तब्ध होऊन स्पंदने क्षणभर थबकतात
काळजात धस्स होऊन मस्तकी वीजा चमकतात
नेमक मृत्यु म्हणजे काय
यातना की सुखदशयन
खर सांगा मृत्यु म्हणजे तरी काय
हरवलेली चेतना की चिरकाल मौनधारण
मी म्हणतो एवढा विचार करायचाच कशाला
दोनच घडींचा डाव आहे मोडायचा कशाला . .2 . .

तो केव्हा कुठे कसा भेटेल नक्की कोणास ठाऊक

नैसर्गीक कृत्रीम की अपघाती येईल होतील का स्वजन भाऊक

अपरिहार्य असला तरी सामोरे जावे लागणार

जीवनपट सविस्तर त्याला सांगावा लागणार

यमसदनी सगळे रेकॉर्डस् तपासले जातील

मग पुढे काय आहे त्याचा निर्णय घेतील

मी म्हणतो एवढा विचार करायचाच कशाला

दोनच घडींचा डाव आहे मोडायचा कशाला . . **3** . .

चिरंजीव किंवा इच्छामरण मिळाले असते तर बरे झाले असते

निदान मनातले संकल्प तरी पुरे केले असते

मृत्यु जर नसता तर भार वाढला असता भुईवर

आजोबांच्या पंजोबांनी बंगला बांधला असता चंद्रावर

म्हणे मृत्यु सत्य आहे याला पुरावा काय

स्वानुभव घेऊन सांगायला परत कुठ कुणी आलाय

मी म्हणतो एवढा विचार करायचाच कशाला

दोनच घडींचा डाव आहे मोडायचा कशाला . . **4** . .

क्षणभंगुर हे जीवन आहे उधळुया आनंदरंग

दोनच घडींचा डाव त्याला समजला

जगला जो क्षणन्क्षण...

## अति अति

**27 मे 2011**

अतिपरिचयात् अवज्ञा सर्वश्रुत आहे
अति तेथे माती सर्वांनाच ठाऊक आहे
तरीही लोक का माती खातात
अपमान होऊनही पुन्हापुन्हा का जातात

अतिशहाणा त्याचा बैल रिकामा
अतिराग आणि भीक माग
तरीही लोक का निष्कारण चिडतात
संधी हुकली म्हणून मुळुमुळु का रडतात

अतिघाई संकटात जाई
अतिखाई परसाकड जाई
तरीही लोक का वरपून हानतात
नको तिथ नको तेव्हा गाडी तानतात

प्रत्येक गोष्ट असावी जोखून मापात

नाहीतर समजा तो गेला बाराच्या भावात

मला कस कळेल नक्की कुठे केव्हा थांबायच?

काळजी नसावी, आपल मनच संकेत देईल आता पुरे झाल्याच

अति अति झाल्यावर मतीही चळते

नको नको म्हटलतरी दुर्गतीकडे वळते

असूद्या ध्यानी, विनाशकाल ओढावते अति अति

सम्यक् वर्तुणुक हाच रामबाण उपाय यावरती .

## स्मृती विस्मृती

**27 मे 2011**

आहे नीटस लक्षात माझ्या अजून

पाचवीला सठवाईन विचारलेला प्रश्न .

तुला स्मृती किती आणि विस्मृती किती देवू?

त्यावर मी ऊत्तरलो दोन्हीही सम द्याव्या

ऐकुनि ती हसली किंचित विस्मयली

वदली "शाब्बास भले!"

मला तेव्हा नव्हता कळला अर्थ तिच्या वरदानाचा

माझे असे मागणे होतेना बरोबर

माझे तसे वागणे योग्य होतेना खरोखर

आता मी पोक्त झालोय वयाने नि अनुभवाने

आता मी मनसोक्त झालोय विचाराने नि आचाराने

काहींदा विस्मरण आसक्तींचे थांबवते दूर मरण

ब-याचदा स्मरण आसक्तींचे लांबवते चिंतेचे कारण

लोक विचारतात  आठवतय का

तुझ्या पहिल्या वाढदिवसाला तू कोणता वेष घातला होतास?

अर्थात लक्षात आहे अजुनि खास

हा पहा फोटो आहे माझ्याकडे तेव्हाचा

काल रात्री काय जेवलो होतो हेच नीटस आठवतोय

थोडे आनंदी थोडे दुःखी क्षण स्मृतीत साठवतोय

स्मृती येते कामाला नेमकी परीक्षेच्या टाईमाला

विस्मृतीपण  येते कामाला नव्याने आयुष्य जगण्याला

श्रवणीय, मधुर, हव्याहव्याशाच आठवणी स्मृतीत राहतात असे नाही

निंदनीय, कटू, नकोनकोशा गोष्टीही ओसरीवर पसरतात पायी

यथायोग्य तयांचा पाहुणचार करावा आणि त्वरित तयांचा रामराम घ्यावा

आता मला कळला अर्थ तिच्या वरदानाचा...

## शब्द

**27 मे 2011**

शब्दांपासून ध्वनी प्रसवला ध्वनीपासून ब्रह्मांड
अद्‌भुत किमया शब्दांची करती मूढास सज्ञान

कधी वाहती बनुनि प्रेमझरा
कधी ओघळती बनुनि अश्रुधारा
कधी रूळती ओठांवरती बनुनि हास्यपिसारा
कधी खेळती जनमनांवरी बनुनि प्रेरतिवारा

हे हे क्षेपणास्त्रापरी प्रभावी, ह्यांत वज्रभेदण्याचे सामर्थ्य
कित्येक युगे उलटली भूमी पालटली, अजुनि अमर्त्य

अफाट शक्ती शब्दांमध्ये अन् विलक्षण युक्ती
मिटवती कलह आपसातला अन्यथा आपसांना मिटवती

शब्द अयोग्य चुकवी श्वास, निष्कारण करी जना निराश
शब्द अचिंत्य देई प्रकाश,  व्यापुनि सारे धरणी आकाश

शब्दांच्या प्रज्ञेतून प्रसवले महामहामंत्र

शब्दांच्या प्रतिभेतून साकारले नवनवेतंत्र

वाणी शुद्ध प्रवाहे शुद्ध शब्दप्रयोगांमुळे

सूज्ञ तयासी समजावे तयाच्या शुद्ध विचारांमुळे

## मिजास

**30 एप्रिल 2011**

इशा-यावर करंगळीच्या नाचवतो सारे जग
कोणीच पकडू शकत नाही असा ठगांचा मी ठग
झाकुन टाकीन सूर्यालाही असा काळाकुट्ट मी ढग
हिंमत कुणाची हात लावायची असा नगांचा मी नग
सूत्रधार मी अन् नटही मीच, मीच रंगवतो सारा वग
क्षणात इथे तर क्षणात तिथे, नीट डोळे उघडुनि बघ

कोण करू शकेल का माझ्याशी बरोबरी
कोण हरवू शकेल मला खरोखरी
हुकमी एक्का मी शंभर टक्का
नडला कुणी झाला गार पक्का
आभाळावर डोके नि पाताळात पाय
भलेभले नमले झाला निरूपाय

आकाशवाणीः

शेरास शेर, शहाण्यास दीडशहाणा

भेटतो भूमंडळी, देतो टक्कर, करतो दैना

टिचकीत मारावा, दंभे त्रास देणारा डास

भाव नको खाऊ, एवढी नको करू मिजास .

## कदमताल

**25 मार्च 2011**

विश्राम, सावधान, दाये मूड, तेज चल .

एक दो एक, एक दो एक

एकसाथ सलामी देंगे, सलामी दो...

चुकला अनेकदा ठेका, हुकला कितीदा मोका

तुटला समन्वय मनाचा, सुटला लय तनाचा

कुठे लक्ष हरवले, कसे भान हरपले

सोडून रांग का अडखळली चाल ?

ठेचकळशी जाग्यावर करिशी कुठवर कदमताल .

सोबती सारे गेले पुढे , मागचेही आता झाले बडे

झाली अवघड वाट आली बिकट स्थिती

भोग नशिबाचा म्हणुनि भोगशी तरी किती

नकोस दुर्लक्षु कमजोरी, स्वबळालाही घे जानुनि

कराया संधीचे सोने, उचल जोखीम नेटाने

वाट कुणाची अजुनि पाहशी, का करिशी जीवाचे हाल ?

ठेचकळशी जाग्यावरी करिशी कुठवर कदमताल .

## स्वरूपदर्शन

**22 फेब्रुवारी 2010**

जगण्याच्या शर्यतीत अस्तित्व कुठतरी हरवलय
नेहमीपेक्षा काहीतरी नवीन करायच अस ठरवलय

धावपळीत उंदरांच्या ध्येय काय ते गमवलय
उंच आकाशात उडायला पंखांत बळ जमवलय

चघळायला विषय खूप समोर, आव्हाने उभी तशीच
जसा चोथा ऊसाचा गु-हाळात, राखतो माळरानात गाईम्हशीच

कपोलकल्पीत संकल्प किती दिवस करणार
कर्तुत्वाचा रथ कधी लक्ष्याकडे धावणार

आधी कृती की दवंडी
आधी माती की गवंडी
आपला आपणच निर्णय घ्यावा
ऐकाया जनाचे कराया मनाचे सद्सदविवेक हवा

दवडे वनवन मृगकस्तुरी शोधात सुगंधाच्या
नसे ठाऊक बापड्याला असे उगम नाभीत तयाच्या

उघड्या डोळयांनी आरशात बाह्यरूपच पाहिलय
खरा माझ्यातला मी बघायचच राहिलय
डोळे मिटुन अंतरंगात पहिल्यांदा डोकावलय
सच्चिदानंद स्वरूपदर्शन प्रथमच अनुभवलय

पाहिली अचिंत्यशक्ती माझ्यातली मी जेव्हा
धावली प्रतिभा अद्भुत कल्पनांपलीकडे तेव्हा
कंपले ब्रह्मांड सारे ओंकार लहरींनी जेव्हा
संपले चक्र जन्ममृत्युचे घडले स्वरूपदर्शन तेव्हा .

## भीमगर्जना (बाबासाहेब आंबेडकर जयगीत) 05 . 06 . 2011

दुमदुमली भीमगर्जना, भेदुनि आस्मानी घुमली

निखळले तेजपुंज नभातून, प्रत्यक्ष धरिणी नमली

यशवंत, बुध्दिवंत लखलखते रत्न भारताचे

विवेकसिंधु, युगप्रवर्तक, प्रबोधक यत्न प्रेषिताचे

जय जय, भीम भीम, जय भीम, भीम भीम, जय जय . . 1 . .

सरली शतके कित्येक, पतित पददलित निशादिन

निराधार ना कोणी वाली, भरकट फरफट दिशाहीन

दाखविली दिशा हात ऊभारून, अनंत उपकार दीनसहाय्यका

उगवली चेतना ज्ञानचक्षूने जगण्या, ऋण अपार मूकनायका

जय जय, भीम भीम, जय भीम, भीम भीम, जय जय . . 2 . .

पेटवली मुळे अंधश्रद्धेची, रूजवली बीजे समतेची

ऐक्याची रयतेला शिकवण, बंधुत्वाचे मानवतेला जतन

“असतो का ठाऊक भ्रूणास, जातधर्म जन्मदात्याचा

मग का भेद करिशी मनुजा, तू उच्चनीचतेचा”

जागली खळबळली सुप्तमने, ऐशा प्रेरीत वर्क्तृत्वाने

प्यायली चवदारजल बहुजने, तैशा नीडर कर्तृत्वाने

जय जय, भीम भीम, जय भीम, भीम भीम, जय जय . . **3** . .

घटनेचे शिल्पकार तुम्ही, तुम्हीच बोधीसत्व

शब्दांचे किमयागार तुम्ही, तुम्हीच ज्ञानीतत्व

नमन तुम्हा, शरण तुम्हा

शतशः वंदन, द्यावी स्फुर्ती आम्हा

जय जय, भीम भीम, जय भीम, भीम भीम, जय जय . . **4** . .

## बाभळीची फुले

**06 . 06 . 2011**

रणरणत्या उन्हात तावतय माळरान
उभी कधीची बांधावर लावुनि ध्यान
संगे वा-याच्या कशी तो-यात झुले
धमक पिवळी लेवुनि अंगावरी फुले

सुबक देखणी ती श्यामल मुर्ती
ठुमकत लटपट चाल तृणांवरती
घेतली शिदोरी धन्याची डोईवरती
टिपते स्वेद पदराने माथ्यावरती

दमली पोहोचली शेतावर बाभळीखाली
विसावली, पाहुनि धन्याला फुटले स्मित गाली

धड धिप्पाड करी कष्ट जिवापाड फुलवाया वावर
राबतो शेतकरी हाकतो नांगर

दिली हाक धन्याला 'यावा भाकर तुकडा खायाला'
सोडले कुरणात सर्जाराजाला चरायला
चालला मर्दरांगडा, दिशेने बाभळीच्या आला
दिला तांब्या पाण्याचा तिने प्यायाला
भरवला तुकडा एकमेकांना

ती म्हणाली 'दिस सणासुदीचा, धनी घरला लवकर या .
यंदा घेईन व्हता म्हणाला झुब्या कानातल्या मला .'

ऐकुनि खंतित चेहरा पडला
'तस न्हाय... यंदा पीक न्हाय आल चांगला
नक्की घीनकी म्होरल्या वरसाला .'

सुटली एवढयात झुळुक वा-याची
ओंजळीत पडली दोन फुले बाभळीची
सुरेख कलाकुसर सोन्याहूनही पिवळी
दिली अतुलानीय भेट तिच्या हाती
लेवुनि ती कर्णफुले कानी
हसली गाली ती राजाची रानी .

## वाताहात

**6 ऑगस्ट 2011**

इवलेसे रोपटे वाढविले अंगणी

फुलले बहरले टेकले गगणी

हर्ष उल्हास स्पर्शला मनी

सजवली स्वप्ने अनेक मिटल्या लोचनी

का कुठुन पडला प्रहार कशी दुभंगली धरणी

ताटातूट लेकराची कसली ही अघटित करणी

मोकलून धाय मागतो देवा भेटूदे लेकराला माय

घोटभर मायेसाठी सुकला कंठ हा कसला न्याय

झाला रिक्त अश्रूसागर तुझ्या आठवणींने बाळा

लावुनि डोळे दरवाज्यावर जागली रात्र झोपाळा

नाही का नशिबी अमुच्या पाहवया प्रतिबिंब तुझे

कसला हा दुरावा सांग काय चुकले रे माझे

पाहुदे भरूनि डोळे एकदा पाडसाच्या पाडसाला

तरेल पुन्हा डोळयांत बालपन खेळताना राजसाला

नको नको बंगला गाडी, नको नको दागदागिणे

तुझ्याविना रे लेकरा जग माझे उणे उणे... जग माझे उणे उणे...

## प्रिय आजी आजोबा बालगीत 26 जुलै 2011

आजी ग आजी लाडीगोडी आजी

सांगते गोष्टी छान छान माझी

ससा-कासवाची नि उंदीर-सिंहाची

लबाड लांडग्याची नि हुशार कोल्हयाची

आजी ग आजी लाडीगोडी आजी

देते खाऊ छान छान माझी

पेढा-बर्फी नि लाडू-जिलेबी

दूध-भात नि बिस्किट-गोळी

आजीचा अंबाडा सुंदर सुंदर आजीची नववारी

आजीचा बटवा सुरेख सुरेख आजीची नथनी

आजोबा हो आजोबा धम्मकलाडू आजोबा

फिरायला बागेमध्ये छान छान नेता

धरून बोटाला बाजारात फिरविता

बसवून खांद्यावर जत्रेत मिरविता

आजोबा हो आजोबा धम्मकलाडू आजोबा

आधी थोडी शिस्त मग गोड गोड पापा

झोपाळयावर बसून रंगतात आपल्या गप्पा

अभ्यास कर चांगला तरच पावेल बाप्पा

आजोबांची काठी सुंदर सुंदर आजोबांचा सदरा

डोळयावर चष्मा लावून ऐटीत वाचतात पेपर सतरा

आजी म्हणजे मोठीऽऽऽ आई

आठवणीने जिच्या डोळयात पाणी येई

आजोबा म्हणजे मोठेऽऽऽ बाबा

बाहेरून कठोर आतून मात्र मऊ गाभा .

## आला आला श्रावणमास बालगीत 4 ऑगस्ट 2011

आला आला श्रावणमास

घेऊनि गंमती जमती खास

सुटला मातीला फुलांचा सुवास

हिरवळीची वसुधेला आरास

घालता शीळ वा-याने शर्यत ढगांची लागली

निळे-जांभळे धूसर-काळे सुटले पळत मागेपुढे

ढमढम ढम ढमाक ढम धडाडधम धडाडधम

धडकला पहिला डोंगराला पायथ्यापर्यंत गडगडला

फवारले तुषार रानात न्हाली झाडेवेली डौलात

रिमझिम रिमझिम भिजले ओले चिंब चिंब

उडाला दुसरा उंचचउंच उभारला सूर्यासमोर

उमटली सावली माळावर रंगल्या गप्पा तासभर

डिंग डिंग डिंग डिंगडीडी डिंग

घालता शीळ वा-याने उडाली धांदल सा-यांचीच

धावू लागले सैरावैरा भिजला थुईथुई मोरपिसारा

छन छन छननन छन छन छन

सूर्याला मग आली जाग

ढगांच्या गर्दीतून डोकावली मान

झटकुनि आळस जांभई दिली

सप्तरंगी चादर हवेत उडविली

छान छान छान दिसते किती छान

आला आला श्रावणमास

घेऊनि गंमती जमती खास

सुटला मातीला फुलांचा सुवास

हिरवळीची वसुधेला आरास

## अंगा-या भिंगा-या बालगीत 26 जून 2011

गिरगिर गिरगिर गिरक्या घेऊ

भिरभिर भिरभिर भिरक्या घेऊ

एक, दोन, साडे माडे तीन ऽऽऽ

भिंगभिंग भिंगभिंग भिंगला झबला

अंगा-या भिंगा-या अंगा-या भिंगा-या

स्वतःभोवती कधी कधी दुस-याभोवती फिरू

फिरफिर फिरफिर फिरक्या मारू

एक, दोन, साडे माडे तीन ऽऽऽ

रिंगरिंग रिंगरिंग रिंगण धरा

अंगा-या भिंगा-या अंगा-या भिंगा-या

थांबा, थांबा, थांबा, बस बस बस्स

घरे झाडे लागलीत फिरू गोलगोल मस्त

एक, दोन, साडे माडे तीन ऽऽऽ

झिंगझिंग झिंगझिंग झिंगलाय वारा

अंगा-या भिंगा-या अंगा-या भिंगा-या

आला आला पाऊस घेऊन रिमझिम सरी

चला सगळे जाऊया आपापल्या घरी

नाही नाही चलाना खेळूया परत

एक, दोन, साडे माडे तीन ऽऽऽ

भिंगभिंग भिंगभिंग भिंगला झबला

अंगा-या भिंगा-या अंगा-या भिंगा-या .

## जिनदो बचपन सुहाना

**05 . 06 . 2011**

कलियॉ है मासूम ऑगन की, ना अभी हमे तोडो
खिलनेसे पहले पंखुडियॉ, ना कभी तुम मरोडो

है जरूरत हमे, थोडी रोशनी और पानी की
है बिनती तुम्हे, सही प्यार और शिक्षा देनेकी

है जरूरत हमे, थोडी हवा और छॉव की
है बिनती तुम्हे, सही ध्यान और सम्मान देनेकी

करेंगे खुशहाल वक्त कलका, बनके किनारा होंगे सहारा
मत छिनो हमसे वक्त आजका, जिनेदो हमे बचपन सुहाना

## वसुधैव कुटुंबकम्

**25 मे 2011**

एक है जमीन एक आसमान

रचें मिलके हसीन दास्तान

पास रहके भी क्यों दूरीयॉं

यह सरहदे यह मजबूरीयॉं

देखलो पुकारके एकबार

बढायेंगे हात दोस्त सौबार

होगा नही कोई भेद

नही होगा कैसा खेद

एक है सब हम

मिलेंगे सुर साथ हमारे

गायेंगे “वसुधैव कुटुंबकम्”

## ...क्या बात!

**2 ऑगस्ट 2011**

सचिन-सेहवागची धडाकेबाज सुरूवात
कर्णधार धोनीची त्याला संयम साथ
त्यावर युवीच्या षटकारांची बरसात
क्या बात...क्या बात!

लताजींच्या सुमधुर स्वरांची जादू आसमंतात
किशोरदाच्या मनमोहक आवाजाची त्याला साथ
त्यावर पंचमदानी गुंफले, गुलजरजींचे शब्द संगीतात
क्या बात...क्या बात!

पाहुनि तुला चंद्रही थांबला, रोखुनि श्वास नभात
घेऊनि सोबतील चमचम चांदण्यांची वरात
त्यावर शीतल वारा, दरवळला शहारा रोमरोमांत
क्या बात...क्या बात!

तू समोर माझ्या भवताली निरव एकांत
लागती बोलू डोळे अपूर्व सुखद दृष्टांत
त्यावर स्मित उधळलेस, घेऊनि हात हातात
क्या बात...क्या बात!

## तुमही तुम

**5 जुलै 2011**

चाहता हूँ तुम्हे खुदसे भी ज्यादा
मॉगता हूँ तुम्हे खुदासे पहला सजदा

लिखता हूँ तो हथेली पर तुम्हाराही नाम लिखता हूँ
सोचता हूँ तो तरकीबे तुम्हे पाने की सोचता हूँ

चलता हूँ तो उन्ही रास्तों पे जो तुम्हारी तरफ चलते है
नाचता हूँ तो तुम बाहों मे हो मेरे जैसे नाचता हूँ

कभी किताबों में कभी गुलाबों में चेहरा तुम्हारा देखता हूँ
कभी जमीन पे कभी फलक पे झलक तुम्हारी ढूँढता हूँ

दुवा करो यारो मुझे वो मिल जाये
मेरी अधुरी जिंदगानी दुबारासे खिल जाए

चाहता हूँ तुम्हे खुदसे भी ज्यादा
मॉगता हूँ तुम्हे खुदासे पहला सजदा

## मैं शायर तो नही...

**27 एप्रिल 2011**

अर्ज किया है...

मुश्किल है उंचाई अंबर की नापना
मुश्किल है गहराई समंदर की कापना
मिल जाते है जब दो दिल जवान
चली आये मंजील सामने खुदबखुद
इतनी आजाती है सपनों में भी जान

यूंतो सुनते है सभी मैं जोभी कहता हूँ
अक्सर समझते है सभी मैं जोभी समझाता हूँ
वो मेरी मेहबूब है जो ना सुनती है ना समझती है
जिसको देख देख मैं इस तरहा मुस्कुराता हूँ

ठंडे झोंके बादलोंको लेके
जमीनपे आ बरसने लगे
हलकेसे छुआ बूंदोंने तुम्हे
उनकेभी दिलों मे शोले सुलगने लगे

नयना तरसे तेरी एक झलक पानेको

कहीं भी रहो तुम, रहो कितनी भी दूर

मिलती हो कभी बनके महेक फूलोंकी

तो कभी सुबहाकी पहली नूर

जुल्फोंका लहराना तेरी

ऑखोंका शरमाना तेरी

देखके मुझको अनदेखा करना

यही अदा तो दिल ले गयी तेरी

शुक्रिया शुक्रिया ...

## Just Dance

**26th June 2011**

Dance Dance, D Da Da, Dance Dance

Dance Dance, J Ja Just, Dance Dance

Open your arms and spin around

Step on the stage or jump on the ground

No need have know steps no need of style

Create a mood and move with a smile

Don't be shy, just forget everything for a while

Don't give reasons; your heart is still agile

Dance Dance, D Da Da, Dance Dance

Dance Dance, J Ja Just, Dance Dance

Hey handsome guys at the back

Come on join the party and raise your hands

Oye beautiful gals sitting alone

Come on join the group and shake your legs

Hello lovely people listen to me

Take a deep breath and dance with me

Dance Dance, D Da Da, Dance Dance

Dance Dance, J Ja Just, Dance Dance

## Quote to Note

**7th June 2011**

- Doing nothing is doing great however at appropriate times.
- When everything is going wrong it's time to sitback and relax instead of spoiling them more.
- You are the eyewitness of your every deed.
- Self-realization is the process of consistent practice.
- You are the best and worst critic of your excellence.
- Don't lose your head otherwise you may actually lose it.
- Don't advocate unless asked.
- Think creative talk innovative.
- You sow a seed in your every deed. Time tells what kind of fruit you will enjoy.
- Unless you come out of comfort zone you will not face challenges.